# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-३/आस्था/एसआर-नं.०३/२०१७ दि.१५/०३/२०१७

**विषय :-** दिनांक १/१/२०१७ रोजीची लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत

**ज्ञापन :-**

शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र. २८४/१२, दि.२१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार ठाणे जिल्हा आस्थापनेवरील स्थानापन्न लिपिक - टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक दि.१/१/२०१७ रोजीची तात्पुरती सूची प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर यादी संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व त्यावर त्यांच्या काही हरकती सूचना असलयास सदर हरकती/ सुचना कार्यालय प्रमुखांनी अभिप्रायासह व संबंधित कागदपत्रांसह सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे या कार्यालयात पाठवाव्यात. मुदतीनंतर हरकती/ सुचना आल्यास विचारात घेतल्या जाणार नाहीत.

तसेच सर्व कार्यालयप्रमुख / महसुल लेखा शाखाप्रमुख यांनी तात्पुरती जेष्ठता सूचीत नमुद कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तक व इतर अभिलेखावरुन त्यांच्या पुर्वाश्रमीच्या नावाची माहिती, जन्मतारखा व जात इ. माहिती तपासुन या कार्यालयास ही यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत सादर करावी.

स्वाक्षरी /-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी ठाणे

**प्रत** :-१.मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे माहितीसाठी सविनय सादर
२. मा. जिल्हाधिकारी पालघर
३. अपर/ उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ठाणे/ उल्हासनगर
४. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे
५. विशेष भुसंपादन अधिकारी ठाणे/ सुर्या प्रकल्प/ लघुपाटबंधारे/ उल्हास खोरे प्रकल्प/ मेट्रो सेंटर नं. ३ ठाणे
६. उप विभागीय अधिकारी ठाणे/ भिवंडी /कल्याण /उल्हासनगर
७. तहसिलदार (सर्व)
८. शाखा प्रमुख (सर्व), जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

जिल्हाधिकारी ठाणे करिता

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in